# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**व्दारा**, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४

दूरध्वनी क्र.:-०२०- २६१२३०६६/६७ वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscepune@gmail.com


जा.क्र. मरापप/भांडार/सर्व्हर दर./2025/

दि. /09/2025

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

दि. 29 SEP 2025

जावक क्र. 4849

**दरपत्रक सूचना**

प्रति,

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

**विषय** :- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकरिता एक वर्ष कालावधीसाठी सर्व्हर भाडयाने घेणेकामी पुरवठादार संस्था नियुक्त करणेसाठीचे दरपत्रक मागविणेबाबत..

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकरिता खालील तक्त्यात नमूद तपशिलानुसार संस्था नियुक्तीबाबत कार्यादेश देण्यात येणाऱ्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी (24x7x365) सर्व्हर भाड्याने घ्यावयाचे असल्याने बंद लिफाफ्यामध्ये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**परीक्षा परिषदेचा स्थलांतरित पत्ता** - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (दुसरा व चौथा मजला) भांबुर्डा, शिवाजीनगर, (राज्यमंडळ), पुणे - 04 यांच्या इमारतीमध्ये.

**अटी व शर्ती-**

1. दरपत्रक बंद पाकिटात असाव्यात. **लखोटा क्र**.1 मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे **(लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे**) जोडून सिलबंद करण्यात यावा व त्यावर तांत्रिक कागदपत्रे बाबतचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
2. **लखोटा क्र.2** मध्ये वित्तीय दर सर्व करासहित नमूद करुन. **(लखोटा क्र.2 वित्तीय दर)** लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर दराचा लखोटा असे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
3. दरपत्रकात सेवेसाठीचा दर वस्तू व सेवा करासहित (GST) समाविष्ट करण्यात यावा.
4. दरपत्रकामधील सेवा सर्व साधारणपणे ज्यांना सेवा देण्याबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांनी वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक व इन्कम टॅक्स क्लियरन्स सादर करणे अपेक्षित आहे.
5. सर्व्हर भाड्याने पुरवठा करणा-या निविदाकाराची (संस्थेची) सेवा समाधानकारक नसल्यास देण्यात येणारी सेवा नाकारण्यात येईल, याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.
6. कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ न निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही. याची काळजी घ्यावी.
7. लखोटा क्र.1 मधील दर्शविलेली प्रमाणपत्रे अपूर्ण असल्यास लखोटा क्र.2 वित्तीय उघडण्यात येणार नाहीत.
8. मंजूर होणाऱ्या संस्थेसोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.
9. संस्थेकडून अटी नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. परिषदेकडून याबाबत सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत वा त्याकडून पत्रव्यवहार करण्यास परिषद बांधील राहणार नाही.
10. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस सर्व्हर भाडे पुरवठा करणेसाठीचे पुरवठादार संस्था नियुक्ती करणेसाठीचे विवरण **लखोटा क्र.2** मध्ये नमूद केले नुसार वित्तीय दराचे दरपत्रक सादर करण्यात यावे.

11. सर्व्हर भाडयाने पुरवठा करण्याकरिता मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील न्यूनतम असलेल्या निविदाधारकाच्या तुलनात्मक तक्त्यातील दर आवश्यकता भासल्यास तडजोडीने कमीत कमी दर निश्चित करण्यात येतील.
12. सदर सर्व्हर भाड्याने पुरवठ्याबाबत कोणताही वाद उद्भवल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण (कोर्ट मॅटर) झाल्यास त्याचे कार्यक्षेत्र पुणे येथील न्यायालयातच अपील करणे बंधनकारक राहील.
13. निश्चित करण्यात आलेल्या सर्व्हर भाड्याने पुरवठा करणाऱ्या संस्थेने मान्य दराने सर्व्हर पुरवठा केलेला नसल्यास सदर सर्व्हरबाबतची तीव्रता लक्षात घेवून रकमेच्या दंडाची आकारणी करण्याचे अधिकार परिषदेस राहतील.
14. घेण्यात येणाऱ्या सदर तीनही सर्व्हरसाठीचे Daily Auto Backup Facility सह देणे बंधनकारक राहील.
15. सदर करार केलेल्या कालावधी संपण्यापूर्वी सर्व Application & Database backup Data हा सेवा देणाऱ्या (सर्व्हर) संस्थेने स्व:खर्चाने Hard disc मध्ये परिषदेस सिल बंद करुन द्यावा लागेल.
16. सदर दरपत्रक परिषदेच्या संकेतस्थळांवर **www.mscepune.in** उपलब्ध आहे.
17. सिलबंद लखोट्यावर **लखोटा क्र.1** तांत्रिक कागदपत्रे - व **लखोटा क्र.2** वित्तीय दर, परिषदेस सर्व्हर भाडयाने घेणेकामी दरपत्रक असे स्पष्ट नमूद करुन दि. 06/10/2025 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्यमंडळ) भांबुर्डा, शिवाजीनगर, आघारकर इन्स्टिटयुट मागे, आगरकर रोड, पुणे - 04 येथे (दुसरा मजला, आवक-जावक शाखेत) कार्यालयात हस्तपोच / सादर करण्यात यावी / देण्यात यावी.
18. टपालाव्दारे/मेलव्दारे/कुरीअर व्दारे प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.
19. दरपत्रक **परीक्षा परिषदेच्या स्थलांतरित (राज्य मंडळ) पुणे** येथील चौथ्या मजल्यावरील आयुक्त दालनात दि. 08/10/2025 रोजी उघडण्यात येईल. त्यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा परिषदेच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.
20. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

**लखोटा क्र.1 - तांत्रिक कागदपत्रे-**

1. संस्था नोंदणीकृत सक्षम प्राधिकारी यांचे / Information Technoligies चे प्रमाणपत्र.
2. संस्थेचे/प्रोप्रायटर यांचे पॅन कार्ड.
3. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र. (जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र नसल्याबाबतचे संस्थेच्या लेटर हेडवर स्वयंघोषित प्रमाणपत्र).
4. ITR, Assessment Year 2023-2024, Assessment Year 2024-2025.
5. केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक, किंवा Information Technoligies क्षेत्रातील संस्थांमध्ये काम केल्याचे छायांकित प्रती.
6. शासन अंगीकृत संस्थामध्ये काळ्या यादीमध्ये नाव नसल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

लखोटा क्र.2 - वित्तीय दर-

| अ.क्र. | सर्व्हर तपशिल | संख्या | दर रुपये प्रति माहे (Per Month) जीएसटी व सर्वकरासह |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1. | Dedicated Server- Windows, Pro-Intel Xenon 2667 V4, 64 GB RAM, 3 TB HDD-Raid 1, Windows Standard 2016/2019 R2, Microsft SQL express edition 2016, 1000 GB Bandwidth Data transfer per month, 2 IP, Alpha SSL certificate, 1 gig Port, Daily Backup Facility. | 1 | |
| 2. | Dedicated Server- Windows, Pro-Intel Xenon 2667 V4, 64 GB RAM, 2 TB HDD-Raid 1, Windows Standard 2016/2019 R2, MySQL, 1000 GB Bandwidth Data transfer per month, 2 IP, Alpha SSL certificate, 1 gig Port, Daily Backup Facility. | 1 | |
| 3. | Dedicated Server- Windows, Pro-Intel Xenon 2667 V4, 64 GB RAM, 4 TB HDD-Raid 1, Windows Standard 2016/2019 R2, Microsft SQL express edition 2016, 1000 GB Bandwidth Data transfer per month, 2 IP, Alpha SSL certificate, 1 gig Port, Daily Backup Facility. | 1 | |

Digitally signed by
Anurradha Avinash Oak
Date: 23-09-2025
22:31:15

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,
पुणे.